*Discipline Specific Core Course 1 F (DSC 1 F)*

## DSC ENG 1 F: Indian Writing in English

### Sem. VI

**External- 60 marks** **Internal- 40 marks**

**Credits- 03 (45 clock hrs)**

**Unit 1. Background:** i) Development of Indian English writing with reference to Poetry and Novel.

ii) Trends, movements and features of Indian English writing with reference to Poetry and Novel.

**Unit 2. Poetry Section:**

I) Arun Koltkar- i. *The Boat Ride.* ii. *Blue Horse (from Jejuri).*



II) Jayant Mahapatra- i. *Indian Summer.* ii. *The Logic.*

III) R. Parthsarathy- i. *From Exile.* ii. *From Trial.*

**Unit 3. Novel:** Sudha Murthy- *Dollar Bahu.*

*Discipline Specific Core Course 1 E (DSC 1 E)*

# DSC ENG 1 E: Indian Writing in English

**Sem. V**

**Objectives-**

1. To introduce students with development of English Literature by Indian Writers
2. To acquaint students with major writers of Indian English Literature
3. To introduce students with content, techniques and styles of Indian writers in English.

External- 60 marks Internal- 40 marks

**Credits- 03 (45 clock hrs)**

**Unit 1. Background:** i) Development of Indian English writing with reference to Poetry and Drama.

ii) Trends, movements and features of Indian English writing with reference to Poetry and Drama.

**Unit 2. Poetry Section :**

I) K. N. Daruwalla- i. *From Ruminations* ii. *Fire Hymn.*

II) Kamala Das. - i. *The Sunshine Cat.* ii. *My Grandmother's House*

III) Nissim Ezekiel- i. *Enterprise* ii. *Philosophy.*

**Unit 3. Drama**: Girish Karnad – *Nag Mandal*

## Semester – III DSE 2 A- 18th Century Literature

**Prescribed Units**

i) **Background study of poetry and novel in the 18th Century Literature**.

ii) **William Wordsworth**: Lines Composed a Few Miles above Tintern Abbey

iii) **S. T. Coleridge**: Rhyme to an Ancient Mariner

iv) **John Keats**: Ode on a Grecian Urn.

v) **P B Shelley**: One Word is too often Profaned

vi) **Lord Byron**: She Walks in Beauty.

(vii) **Jane Austen**: *Sense and Sensibility*. (Novel)

**Semester - IV – DSE 1 B- 17th Century Literature-**

**Credits- 03 (45 clock hours)**

**Prescribed Units**

(i) **Growth and development of Novel and Essay in the 17th century**.

(ii) **Essays:**

A) **Francis Bacon**: a) Of Studies,

b) Of Anger,

c) Of Unity In Religion

B) **Jonathan Swift**: a) A Treatise on Good Manners and Good Breeding

b) Hints Towards an Essay on Conversation

c) Of the Education of Ladies

(iii) **Novel:**

***Pilgrim's Progress*** (Part First of Novel) by John Bunyan

---

# रूचि आधारित साख पद्धति
## Choice Based Credit System (CBCS)
## बी.ए.प्रथम वर्ष कला हिन्दी
## द्वितीय सत्र पाठ्यक्रम

✦ **मुख्यांश प्रतिष्ठा (Core Course) DSC HIN A-2 : हिंदी कविता**

**पाठ्यपुस्तक : आधुनिक हिंदी काव्य प्रवाह - संपा- डॉ. ब्रह्मनेश्वर नाथ राय**
**प्रकाशक - शैलजा प्रकाशन,**
**57-पी, कुंज बिहार - II, यशोदा नगर**
**कानपुर-11, संस्करण 2014**

➢ **निर्धारित पाठ्यपुस्तक में से निम्नलिखित कवियों की कविताएँ अध्ययनार्थ रखी गई है :-**

**1)** सखि, वे मुझसे कहकर जाते - मैथिलीशरण गुप्त

**2)** तोड़ती पत्थर - सूर्यकान्त त्रिपाठी `निराला`

**3)** सुख-दु:ख - सुमित्रानन्दन पन्त

**4)** गीतकार मर गया - रामधारी सिंह `दिनकर`

**5)** जो बीत गई - हरिवंशराय बच्चन

**6)** प्रेत का बयान - नागार्जुन

**7)** सूनी-सी साँझ तक - अज्ञेय

**8)** गीत-फरोश - भवानी प्रसाद मिश्र

**9)** गाँधी जी के जन्मदिन पर - दुष्यन्तकुमार

**10)** प्रौढ़ शिक्षा - धूमिल

**11)** पिता - उदय प्रकाश

**12)** सात भाइयों के बीच चम्पा - कात्यायनी

**13)** स्त्रियाँ - अनामिका

**14)** खोज की बुनियाद - सुशीला टाकभोरे

**15)** अपने घर की तलाश - निर्मला पुतुल

-----------

✦ **संदर्भ ग्रंथ -**

1) आधुनिक हिंदी काव्य प्रवाह - संपा. डॉ.ब्रह्मनेश्वर नाथ राय
2) नई कविता के नए कवि - विश्वंभर मानव
3) समकालीन कविता - विश्वनाथ प्रसाद तिवारी
4) समकालीन कविता - डॉ. सरजू प्रसाद मिश्र
5) आधुनिक हिंदी काव्यधारा - डॉ. सरजू प्रसाद मिश्र
6) कविता के नए प्रतिमान - डॉ. नामवर सिंह
7) समकालीन कविता का बीजगणित - कुमार मिश्र
8) समकालीन हिंदी कविता - परमानंद श्रीवास्तव
9) आधुनिक कविता का पुर्नपाठ - डॉ. करूणा शंकर उपाध्याय
10) छायावादोत्तर हिंदी कविता में ग्राम्यबोध - डॉ. सरोज वर्मा

# ती आणि मी

भवरलाल जैन

तिजोरी गल्लीत पहिल्या मजल्यावर भाटे बिल्डिंगमध्ये असलेलं हे आमचं घर रुपये सोळा दरमहा भाड्याचं. एकूण शेजारी दोन कुटुंबं. पाणी भरण्यासाठी खाली तळमजल्यावर जायला लागे. कांताबाईनेही त्यामुळे रांगेत उभं राहून मिळवलेल्या पाण्याच्या दोन बादल्या घेऊन खालून वरच्या मजल्यापर्यंत आणल्या. पाणी आणण्याची सवय लग्नापासूनच लावून घेतली होती. घरातील इतर मंडळीही तेच करीत असत. त्या वेळी या दोन खोल्यांमध्ये सुरुवातीला (१९५४-६३) वडील हिरालालजी, मी व माझा भाऊ कांतीलाल तसेच काकी नथीबाई व बन्सीभाऊंच्या पत्नी ताराबाई किंवा माझी आई गौराबाई या दोहोंपैकी एक जाऊन-येऊन असत. नंतर १९६४ ते १९७२ पर्यंत बन्सीभाऊ व त्यांचे कुटुंब हेसुद्धा जळगावला याच घरात निवासासाठी वाकोदहून स्थलांतरित झाले. एकवेळ अशी होती, की एकूण या दोन खोल्यांत आम्ही सोळा जण एकत्र राहत असू. काही वेळा केवळ बाळंतपणासाठी म्हणून शिवराजजींच्या पत्नीलासुद्धा वाकोदहून जळगावमध्ये आणावे लागे. अशा वेळी बाळंतपणाच्या कालावधीसाठी, म्हणजे दोन-तीन महिन्यांसाठी, तात्पुरती मिळेल तिथे एखादी खोली भाड्यानं घेत असू.

किमान तीन व्यक्तींचा संसार, मुलं-मुली, आई-वडील, पाहुणे-रावळे यांच्यासह दोन खोल्यांमध्ये धकवावं लागत होतं. त्या वेळी या घराच्या तीन बाजूंनी असणारा चार फूट रुंदीचा व्हरांडा कामी येत असे. घरावरील गच्ची तर जणू आमची रीतसर मोठी खुली बेडरूम कम हॉलच होता. आळीपाळीनं सगळेच लोक पावसाळा सोडून इतर वेळी तिथं झोपत असत. साधा नियमच असा झाला होता, की सर्व स्त्रियांनी स्वयंपाकखोलीत झोपावं, तर पुरुषांनी व्हरांड्यात अथवा गच्चीत झोपावं. असं असताना एका गोष्टीची विशेष नोंद करावीशी वाटते. घरात लहान व सगळ्यांचा लाडका मी असल्यामुळे व माझं लग्न नुकतंच झालं असल्यामुळं आमच्यासाठी एक खोली राखीव असे. मग बाकीचे सगळे व्हरांडा, गच्ची व स्वयंपाकाची खोली यांच्यामध्ये आळीपाळीनं संसार करीत. एकत्रित कुटुंबात माझ्या घरच्या मंडळींनी घालून दिलेली ही परंपरा त्यांच्या विशाल अंत:करणाची व भावभावनांची दाद देणारी आहे. तसेच 'स्पेस' नसतानाही 'ती' निर्माण करता येऊ शकते, त्याचे हे जिवंत उदाहरण. 'स्पेस'चा संबंध वेळेशी

किंवा स्थळाशी नसून आंतरिक भावनांशी असावा. परस्परांच्या आवडी-निवडी, नड-निकड, कारण-प्रयोजन, छंद-फंद या सर्वांनाच केंद्रस्थानी ठेवून संयुक्त परिवारात कुणाला कशी व किती 'स्पेस' द्यावी, हे आपसूकच घडत असते. पाहिजे तो मनाचा चांगुलपणा, स्वत: झिजून इतरांसाठी त्यागाची तयारी, मोठे असून लहान होण्याची व्यापकता किंवा लहान असून मोठेपणा दाखविण्याचा समंजसपणा. गोळाबेरीज करता परस्परांचे भाव व स्वभाव यांची सांगड घालण्याच्या तडजोड वृत्तीतून 'स्पेस' आपोआपच निर्माण होते. अर्थातच या सगळ्या प्रपंचाच्या बुंध्याशी असणारी एक गोष्ट म्हणजे असल्यारीतीने सहजीवनाकरिता पुरेसे आर्थिक पाठबळ नसणे, हे आहे.

अर्थात हे म्हणत असतानाही, मला असं स्पष्ट करावंसं वाटतं की केवळ आर्थिक चणचणीमुळे संयुक्त कुटुंबं उभारली जात नाहीत किंवा चालविताही येत नाहीत असे नाही. या उदात्त परंपरेला चालविण्यासाठी लागतो मनाचा मोठेपणा, हृदयाचा दिलदारपणा. या संयुक्त कुटुंब पद्धतीच्या परंपरा जोपासल्या जातात त्याचं मूळ कारण म्हणजे त्यामुळे साध्य होणारी विकासाची गती. ती केवळ सबळ घटकांसाठीच नव्हे तर सर्व घटकांसाठीच. पाचही बोटे सारखी नसतात असं म्हणतात, परंतु संयुक्त कुटुंबामध्ये त्यांना सारखं समजून समानतेच्या भावभावनांनी वागविले जाते.

दोन खोल्यांचं घर अगदीच लहान असल्यानं व्हरांड्यात बोललेलं सरळ सर्वदूर ऐकू येत असे.

''त्या मेल्याचं काय आहे? तो माझं सगळंच खाऊन बसला. सोनंनाणं घेतलं, शेतीवाडी स्वत:च्या नावावर लावून घेतली. गुरंढोरं घेऊन गेला. विधवेचं खाऊन त्याला काय मिळणार आहे?... ... ...'' तोंडापूरवाल्या राजकंवरबाईंचे हे शब्द स्पष्टपणे कानावर पडत होते. दोन शब्द बोलल्यानंतर रडण्याचाही आवाज येत होता.

कांताबाई नित्यनियमाप्रमाणं दुपारी स्वयंपाकघरात भाजी कापत होती. 'आज संध्याकाळी पाहुणे येतील, मी त्यांच्याबरोबरच जेवणार आहे,' असं मी सकाळी सांगून गेलो होतो. नेहमी रात्री ११ ते १२।। च्या दरम्यान जेवणारे 'हे' आज पाहुण्यांसाठी तरी लवकर येतील, ही गोष्ट तिच्यासाठी तर खूपच आनंददायी असे. मुलाबाळांशी बोलणं न का होईना निदान मुलं झोपण्यापूर्वी, त्यांच्या डोक्यावरून हात फिरवून कुरवाळतील, हेही काही कमी नाही, असं तिला वाटत असावं. असल्या विचारांमध्ये गुंग असताना व्हरांड्यामध्ये राजकंवरबाईंची चालणारी ही बडबड कांताबाईला नवीन नव्हती.

माझे काका राणीदानजी या राजकंवरबाईंना आपली बहीण मानीत असत.

हिरालालजी, राणीदानजी, बन्सीलालजी हे सर्वच वेळोवेळी तोंडापूर या गावी बाजारहाटाच्या निमित्ताने जात. तोंडापूरचं प्रमुख मारवाडी घराणं म्हणून श्री. पूनमचंदजी, तखतमलजी, जोधराजजी राका या तीन भावांचं कुटुंब गावात नावाजलेलं व भारदस्त घराणं समजलं जात असे. खरंतर राका कुटुंब हे मूळ आलं ते नागपूरहून. आजही नागपूरला 'पूनमचंद पार्क' म्हणून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक भलं मोठं उद्यान आहे. हे तिघे भाऊ आजीवन गांधीवृत्ती बाळगून खादीधारी राहिले. व्हरांड्यात बडबडणारी ही राजकंवरबाई म्हणजे दुसरी कोणी नसून, तखतमलजींची धर्मपत्नीच होती. ती मूळ चोरडिया घराण्यातून आलेली असल्यानं आणि आम्हीही सहगोत्री चोरडियाच असल्यानं साहजिकच आमच्या घरातील सगळ्या पुरुषमंडळींना ती 'भाऊ' म्हणून संबोधित असे.

हिरालालचा भवरलाल नऊ नवसांनंतर झालेला म्हणून इतर सर्वांप्रमाणेच या राजकंवरबाईचंही माझ्यावर अलोट प्रेम होतं. ती सांगत असे, ''गाड्या गाड्या काय करताय तुम्ही? माझ्या भवरूच्या चार दरवाजांना, चार-चार गाड्या उभ्या राहतील. नोटांची पोतीच्या पोती भरतील! सारी दुनिया डुबून जाईल; पण भवरूचं घर अगदी आहे तसंच राहील!'' इतर बाजारांप्रमाणे तोंडापूर बाजाराला जात असताना आमच्या घरचे लोक दशम्या सोबत नेत असत; पण ते कळताच उदारमनाची राजकंवरबाई त्या दशम्या बाजूला काढून ठेवत त्यांना गरमागरम जेवण देत असे. एवढं प्रेम देणारी ही बाई आज काही मानसिक ताणतणावामुळे, रोगामुळे ग्रस्त झाली होती. ही सगळी पार्श्वभूमी कांताबाईला माहीत असल्यामुळे कांताबाईला तिची बडबड, 'बडबड' वाटत नसे. ती तिच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून शांत राहत असे.

40840

राजकंवरबाईंकडे अशोकला मांडीवर खेळवण्याचं काम ती मुद्दामहून देई. जेणेकरून त्यांची 'बडबड' कमी होऊन येणाऱ्या पाहुण्यांना त्यांचा मागमूस लागू नये. काय हा योग? दिशेवर दशा अवलंबून असते, असं म्हणतात; पण प्रस्तुत बाबीत राजकंवरबाईंची दशा ही दैवदुर्विलासच होता, असं म्हणावं लागेल. नियतीची खेळी नियतीच जाणे! परिस्थिती काय असेल व काय होईल, यावर आपले नियंत्रण नसते. परिस्थितीला कोणता व कसा प्रतिसाद द्यावा, हे मात्र निश्चितच आपल्या हातात असते, हा मंत्र कांताबाईनं आत्मसात केला होता. म्हणून ती वास्तवाशी कधीच भांडली नाही, वस्तुस्थितीशी भांडली नाही. तिचा स्वीकार करून यथोचित मार्ग काढत राहिली. तसं पाहता कोण आली ही राजकंवरबाई? कशासाठी कांताबाईनं तिचं हे सगळं सहन करावं? कांताबाईला तिचे सासू-सासरे, दीर, चुलत सासरे-सासूबाई, घरात येणारी अगण्य पाहुणेमंडळी, हा व्याप व ताप पुरेसा नव्हता का? वरून राजकंवरबाईंची ही डोकेदुखी कशासाठी?

तो काळ मात्र तसा नव्हता. त्या वेळची बाईमाणसंही तशी नव्हती.

लोक आपसांतले ऋणानुबंध, स्नेहसंबंध, बंधन-बांधिलकी पाळत असत, जपत असत. जगताना उपसावे लागणारे कष्ट, करावा लागणारा त्याग, भोगावे लागणारे भोग सगळं करण्यामध्येच त्यांना धन्यता वाटत असे. आपण स्वत: काही वेगळे आहोत असल्या प्रकारची प्रौढी मिरवणारे अपवादानेच त्या वेळी दिसत असत. गावधर्म, शेजारधर्म, नातीगोती, अगदी मानलेलं धर्माचं नातंगोतं या सर्वच गोष्टींना एकप्रकारच्या पवित्रतेचं आवरण होतं. त्याची पूजा बहुतांश लोक करीत असत. सुसंस्कारित, रूढीप्रिय कुटुंब तर कटाक्षानं पाळीत असत. जीवन हा एक यज्ञ आहे आणि त्यात जिथे-जिथे शक्य असेल ती आहुती खारीचा वाटा म्हणून अर्पण करीत राहावं, अशी त्यांची मूळ भावना असे.

अशाच एका कुटुंबामध्ये कांताबाईनं प्रवेश केला होता आणि आता ते कुटुंब तिचंच झालेलं होतं. त्यामुळे त्या घर-कुळाचे रीतिरिवाज, संबंध-अनुबंध, तृण-ऋण पाळणं हे सगळं ओघानंच तिच्याकडं चालून आलं होतं. नव्हे; कांताबाई एका नवोदित कुटुंबप्रमुखाची विद्याविभूषित, सुसंस्कारित व भक्कम कारभारीण असल्यानं ही जबाबदारी तिनं जणू नकळतच स्वत:कडे ओढून घेतली होती.

नावाजलेल्या, सुसंस्कारित, एकत्र कुटुंबातून ती आली होती. कांताबाईला आठ काका व सहा आत्या होत्या. तिच्या आजीची एकूण तेवीस बाळंतपणं झाली होती, त्या एकशेसहा वर्षांच्या होऊन निवर्तल्या होत्या. कांताबाईच्या आनुवंशिकतेचा हा एक भाग. कांताबाईचे आजोबा चुनीलालजी हे त्या वेळचे ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. विजापूरच्या गोलघुमटात असलेल्या तोफेवर बसलेला त्यांचा काढलेला दिमाखदार फोटो त्या वेळच्या त्यांच्या सामाजिक व शासनदरबारी असलेल्या मानमरातबाचा दाखलाच म्हणावा लागेल. ते जिल्हा परिषदेचे अध्यक्षसुद्धा होते. आजही ते राहत असलेला परिसर 'चुनीलाल बंगला' म्हणून ओळखला जातो. कांताबाईचे वडील उत्तमचंदजी हेसुद्धा दिलदार मनाचे रुबाबदार व्यक्तिमत्त्व होते. तेथील मार्केटिंग कमिटीचे अध्यक्ष होते. या घराचा असा वारसा आणि वसा तिला लाभला होता. हे सारं लक्षात घेता कांताबाईमध्ये काही गुण आनुवंशिकतेनंच आलेले असावेत. सोशिकपणा, कृतज्ञताभाव, सर्वांना सांभाळून चालणं, कोणी काही उलटसुलट बोललं तरी उलट उत्तर न देणं, लहानथोरांचा आदर करणं इत्यादी. या संस्कारांबरोबर तिला उच्चशिक्षणाचीसुद्धा जोड होती. माहेर विजापूर असूनही शेजारपाजार मात्र महाराष्ट्रीय परिवाराचा. त्यातही कोकणस्थ ब्राह्मणांची घरं. जिवाभावाच्या मैत्रिणी तशा दोन - कुमुद बापट व सुधा कुलकर्णी. त्यामुळं कांताबाईच्या व्यक्तिमत्त्वावर ब्राह्मणी संस्कार

झाले. शुद्ध, स्पष्ट, संस्कृतप्रचुर मराठी भाषा हे तिच्या वाणीचं वैशिष्ट्य.

पोस्टानं बाहेरून तिने मुंबई एस.एन.डी.टी. विद्यापीठाचं बी.ए. केले, तेही इंग्लिश, अर्थशास्त्र आणि गृहविज्ञान हे मुख्य विषय घेऊन. (१९५८-५९) अशा प्रकारे कांताबाई विजापूर भागातील, मारवाडी समाजातली, पहिलीच ग्रॅज्युएट झाली. तिला इंग्रजी शिकवायला निवृत्त अध्यापक गांधीवादी स्वातंत्र्यसेनानी श्री. हनुमंत आचारी येत असत. कर्नाटकातील विजापूर हा भाग त्या वेळी खूपच मागासलेला होता. त्यात मारवाडी समाज अगदीच सनातनी मानला जात असे. अकरावीनंतर तिचे वडील तिला ग्रॅज्युएट करणार आहेत, या वार्तेनं संतप्त होऊन उत्तमचंदजींकडे गावातील मारवाडी समाजाच्या दहा-पंधरा लोकांचे एक शिष्टमंडळ गेले.

ते म्हणाले, ''अहो, तुम्हाला काय वेडबिड लागलंय का? मुलीला ग्रॅज्युएट करून तुम्ही कशाला तिचं जीवन उद्ध्वस्त करता? तिला वरणारा मुलगा तरी भेटला पाहिजे ना? 'नाकापेक्षा मोती जड' म्हणून बी.ए. झालेल्या कांतेला तो कशाला स्वीकारेल? ती काय तुमच्या घराण्याचं नाव काढणार आहे? खरंतर हा तुमच्या घराण्याला कलंक ठरेल. मुलीला शिक्षण म्हणजे पापच. मुलींना कॉलेजात टाकणे म्हणजे आपल्या समाजाचं नाक कापण्यासारखंच आहे. पंधरा-सोळा वर्षांची म्हणजे वयात आलेली मुलगी. तिच्या दोनाचे चार हात करून मोकळे व्हा. ती ग्रॅज्युएट होईल त्याआधीच ती दोन मुलांची आईसुद्धा होऊन जाईल. कशाला नसत्या भानगडीत पडता?'' असा हा पोक्तपणाचा अनाहूत सल्ला उत्तमचंदजींना मिळाला होता.

कांताबाई ही उत्तमचंदजींची खूपच लाडकी लेक होती. ते सुधारमतवादी, सरळ स्वभावी होते. कांताबाई घागरा-पोलका, दोन वेण्या, कृश अंगकाठी, गौरवर्णी आखीवरेखीव चेहरा यामुळे वडिलांच्या दृष्टीने तरी अत्यंत चुणचुणीत, सुंदर व मोहक अशाच होत्या. उत्तमचंदजींनी सगळ्या विरोधाला बाजूला सारून कांताबाईला बाहेरून बी.ए. केलं. अभ्यास करण्यासाठी व परीक्षा देण्यासाठी मात्र त्यांनी तिला कांताबाईंची मोठी बहीण शांताबाई यांच्याकडे काळबादेवीला-विठ्ठलवाडीत महिन्या-दोन महिन्यांसाठी पाठवलं होतं.

मारवाडी समाजात शिक्षणाच्या बाबतीत एकूण धारणा व मनोवृत्ती उदासीनतेची, आकसाची राहिली आहे. राजस्थानी एक म्हणच आहे, 'भिण्या मांगे, अनभिण्यारे बारणे भीक.' 'शिकला-सवरलेला माणूस हा अशिक्षितांकडे पाणी भरत असतो.' तेव्हा शिक्षण म्हणजे सर्वकाही असते असे नाही. पुस्तकी शिक्षण नसले तरी चालेल, व्यावहारिक शहाणपण मात्र हवे, हे म्हणण्याचा मारवाडी समाजाचा रिवाज होता. केवळ मुलींच्याच शिक्षणाबाबत नव्हे; तर

# नसीमा आणि हेल्पर्स

अनिल अवचट

बाहेर पाऊस झिमझिमतो आहे आणि मन नसीमा दीदी या व्यक्तीनं व्यापून गेलं आहे. टेबलावर त्यांनी इतर अपंगांना, हितचिंतकांना लिहिलेली पत्रं आहेत. पलीकडच्या फायलीत त्यांचे गुरू बाबूकाका यांनी दीदींना लिहिलेल्या पत्रांचा गठ्ठा दिसतो आहे. त्यांच्या संस्थेत मी काढलेल्या अपंग मुलांच्या फोटोंचं पाकीट दिसतं आहे. दीदींच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या समवेत मी सगळे मिळून जेमतेम आठएक दिवस घालवले असतील. पण काल त्या फोनवर म्हणाल्या, ''तुम्ही आम्हांला आमच्या कुटुंबापैकीच वाटता.'' अगदी नव्या माणसाला कुटुंबात पटकन सामील करून घेण्याची त्यांची ताकदही विलक्षण आहे.

कोण या नसीमा दीदी?

कुठली त्यांची संस्था?

मला तर दोनतीन महिन्यापूर्वी त्यांचं नावही माहीत नव्हतं. कोल्हापूरला इतक्यांदा जातो. तिथल्या सार्वजनिक जीवनातले माझे बरेच मित्र आहेत. पण हे नाव कधी कानावर आलं नव्हतं. मी कोकणात देवगड जवळच्या कोळोशी गावी गेलो होतो. तिथल्या नारायण आश्रम संस्थेच्या शरद कुलकर्णी यांच्याकडे गप्पा मारताना प्रथम त्यांचं नाव निघालं. त्यांचे आश्रमाचे अनेक उपक्रम ते सांगत असताना अपंगांच्या शिबिराचा विषय निघाला. नसीमा दीदींविषयी त्यांनी सांगितलं. गॅदरिंगमध्ये डान्स करताना पडल्या आणि अपंगत्व आलं. त्या इतरांसाठी काम करतात. सिनेमातल्या सुधा चंद्रन या अभिनेत्रीची आठवण झाली. कुतूहल वाटलं. देवगडहून येताना कोल्हापूरला थांबलो. त्यांना, सहकाऱ्यांना भेटलो. तेव्हा 'फिल्मी' कुतूहल धुळीला मिळालं. त्या सर्वांच्या जीवघेण्या प्रवासाचं जेव्हा दर्शन झालं तेव्हा मनापासून शरमून गेलो.

नसीमा दीदी पहिल्यांदा भेटल्या, त्या त्यांच्या सेंट्रल एक्साइजच्या ऑफिसात. तिथं त्या डेप्युटी ऑफिस सुपरिटेंडेंट आहेत. टेबलाला व्हीलचेअर लावून समोर फाईल उघडून काम करत असलेल्या. आम्हांला बघताच प्रसन्नपणं हसल्या. पंचेचाळिशीतल्या. गोल चेहरा. चेहऱ्याचे ठसठशीत फीचर्स. चेहऱ्यापासून दूर जाणारे, छोटे, काळे-पांढरे कुरळे केस आणि सगळ्यांत लक्षात राहणारं शुभ्र दातांचं शांत स्मितहास्य. बोलण्यात विषयाप्रमाणं चेहऱ्यावरचे हावभाव बदलत.

# नसीमा आणि हेल्पर्स

अनिल अवचट

बाहेर पाऊस झिमझिमतो आहे आणि मन नसीमा दीदी या व्यक्तीनं व्यापून गेलं आहे. टेबलावर त्यांनी इतर अपंगांना, हितचिंतकांना लिहिलेली पत्रं आहेत. पलीकडच्या फायलीत त्यांचे गुरू बाबूकाका यांनी दीदींना लिहिलेल्या पत्रांचा गठ्ठा दिसतो आहे. त्यांच्या संस्थेत मी काढलेल्या अपंग मुलांच्या फोटोंचं पाकीट दिसतं आहे. दीदींच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या समवेत मी सगळे मिळून जेमतेम आठएक दिवस घालवले असतील. पण काल त्या फोनवर म्हणाल्या, "तुम्ही आम्हांला आमच्या कुटुंबापैकीच वाटता." अगदी नव्या माणसाला कुटुंबात पटकन सामील करून घेण्याची त्यांची ताकदही विलक्षण आहे.

कोण या नसीमा दीदी?

कुठली त्यांची संस्था?

मला तर दोनतीन महिन्यापूर्वी त्यांचं नावही माहीत नव्हतं. कोल्हापूरला इतक्यांदा जातो. तिथल्या सार्वजनिक जीवनातले माझे बरेच मित्र आहेत. पण हे नाव कधी कानावर आलं नव्हतं. मी कोकणात देवगड जवळच्या कोळोशी गावी गेलो होतो. तिथल्या नारायण आश्रम संस्थेच्या शरद कुलकर्णी यांच्याकडे गप्पा मारताना प्रथम त्यांचं नाव निघालं. त्यांचे आश्रमाचे अनेक उपक्रम ते सांगत असताना अपंगांच्या शिबिराचा विषय निघाला. नसीमा दीदींविषयी त्यांनी सांगितलं. गॅदरिंगमध्ये डान्स करताना पडल्या आणि अपंगत्व आलं. त्या इतरांसाठी काम करतात. सिनेमातल्या सुधा चंद्रन या अभिनेत्रीची आठवण झाली. कुतूहल वाटलं. देवगडहून येताना कोल्हापूरला थांबलो. त्यांना, सहकाऱ्यांना भेटलो. तेव्हा 'फिल्मी' कुतूहल धुळीला मिळालं. त्या सर्वांच्या जीवघेण्या प्रवासाचं जेव्हा दर्शन झालं तेव्हा मनापासून शरमून गेलो.

नसीमा दीदी पहिल्यांदा भेटल्या, त्या त्यांच्या सेंट्रल एक्साइजच्या ऑफिसात. तिथं त्या डेप्युटी ऑफिस सुपरिंटेंडेंट आहेत. टेबलाला व्हीलचेअर लावून समोर फाईल उघडून काम करत असलेल्या. आम्हांला बघताच प्रसन्नपणं हसल्या. पंचेचाळिशीतल्या. गोल चेहरा. चेहऱ्याचे ठसठशीत फीचर्स. चेहऱ्यापासून दूर जाणारे, छोटे, काळे-पांढरे कुरळे केस आणि सगळ्यांत लक्षात राहणारं शुभ्र दातांचं शांत स्मितहास्य. बोलण्यात विषयाप्रमाणं चेहऱ्यावरचे हावभाव बदलत.

पण जेव्हा वाक्य संपे, तेव्हा परत ते हास्य चेहऱ्यावर पसरे. हास्य हा चेहऱ्याचा नॉर्मल भाग.

पुढं कळलं त्यांना सतत या ना त्या वेदना होत असतात. ब्लडप्रेशरचा त्रास आहेच. त्यामुळं डोकेदुखी नेहमीची. त्यांना स्पाँडिलायटिसचा वाढता आजार असल्यानं हाताला सतत मुंग्या येत असतात. एकदा तर माझ्यादेखत त्यांच्या सहकाऱ्याला हातानं काही वस्तू देताना यांच्या हातातून वस्तू पडली, तर माझ्याकडं वळून म्हणाल्या, ''बघा ना, अलीकडं ही हाताला अशी पकडच राहत नाही.'' आणि असंही म्हणून त्या हसल्या. पुढं जेव्हा मी नंतर बऱ्याचदा बोलायचो तेव्हा त्यांचा व्हीलचेअरवरचा एक पाय सारखा उडायला लागायचा. त्या हातानं दाबून धरायच्या. नाहीतर दुसरा पाय हातानं त्यावर आडवा ठेवून त्यावर हातानं दाब देऊन तो ट्रेमर घालवायचा प्रयत्न करायच्या. पण तरीही चेहऱ्यावर हास्यच.

कुठून मिळाली ही त्यांना या प्रसन्न हास्याची देणगी?

आम्हांला सर्व असून आम्ही का रडतो?

त्यांच्या ऑफिसात काम करणाऱ्या मनोहर देशभ्रतारांची गाठ दीदींच्या आधी पडली होती. देशभ्रतार हे नागपूरचे. बदली होऊन कोल्हापूरला आलेले. मी विचारलं, ''तुम्ही अपंग नसताना या कामात कसे आलात?''

''दीदींमुळं. आलो त्या वेळी बॅचलर होतो. बॅचलर ग्रूपमध्ये गेलो असतो, तर पार्ट्या करत बसलो असतो. निरनिराळे नाद लागले असते. कदाचित भरकटलोही असतो. पण केवळ दीदींमुळं तसं झालं नाही. टंगळमंगळ करत इकडंतिकडं भटकायचो. दीदी एका जागी बसून स्वत:ची कामं तर संपवायच्याच; पण इतर अनेक जणांची कामंही करायच्या. त्यांना इथं ऑफिसच्या आवारात क्वार्टर होतं. तिथं अपंग मुलं यायची. ऑफिसातही पत्ता काढत यायची. कुणाला फीला पैसे दे, कुणाला पुस्तकांना पैसे दे, कुणाला कॅलिपरला, तर कुणाला ऑपरेशनला. असा सगळा पगार त्यात संपवून टाकत. त्यात रक्तदान करण्याची त्यांना फार हौस. हॉस्पिटलकडून फोन आला रे आला, की चालली यांची व्हीलचेअर तिकडं. दर दोनतीन महिन्याला त्या रक्त द्यायच्याच. मला वाटू लागलं, निदान आपण यांना थोडी मदत करू या. म्हणून मग मी त्यांची व्हीलचेअर ढकलू लागलो आणि मग त्यांच्या कामात मी ओढलो गेलो तो कायमचाच.''

सुजला नित्सुरे या त्यांच्या पुण्यातील, हितचिंतकांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी लिहिलं आहे – 'मी हे जे कार्य करीत आहे, त्याचं पूर्ण श्रेय श्री. मनोहर देशभ्रतार यांना, जे सावलीसारखे माझ्या सोबत आहेत व माझे पायही तेच आहेत. ते असल्यावर मला चालता येत नाही हेच मी विसरून जाते. अनेक धाडसी उपक्रम हाती घेते.' पुढं देशभ्रतारांचं लग्न झालं. पत्नीला या कामाचं,

त्यांच्यातल्या विशुद्ध नात्याचं मोल कळायला वर्ष लागलं. पण नंतर ते कळल्यावर त्याही या कामात सामील झाल्या.

दुसरे गृहस्थ भेटले ते पी. डी. देशपांडे. हे रजनी करकरे या पोलिओमुळं अपंग झालेल्या, नसीमा दीदींच्या मैत्रिणीचे यजमान. वयानं रजनीताईंपेक्षा सतरा वर्षांनी लहान. प्रेमात पडले. घरच्यांचा विरोध सहन केला. आता पी. डी. म्हणजे संस्थेतले महत्त्वाचे साथीदार आहेत. त्यांनाही विचारलं, ''तुम्ही या कामात कसे आलात?''

ते म्हणाले, ''रजनीमुळं मी थोडाफार भाग घ्यायचो. पण फारसा नव्हतो. नसीमा दीदी एकदा खूप आजारी होत्या. कावीळ, युरिनरी इन्फेक्शन असं कायकाय झालं होतं. खूप म्हणजे खूपच सीरियस होत्या. आम्ही दोघंही त्यांना कोल्हापूरमधल्या मिशन हॉस्पिटलमध्ये भेटायला गेलो. डोळे उघडायचीही ताकद नव्हती. आम्ही गेल्यावर संस्थेपुढच्या अडचणी, पैसे कसे उभे करायचे, असं काही बोलणं चाललं होतं. सुरेश भटांशी माझी काही दिवसांपूर्वीच ओळख झाली होती. मी दीदींना हे म्हणताच त्यांना एकदम उत्साह आला. लगेच चेहरा उजळला. आवाज फुटला. परत ताज्या दमानं बेत करू लागल्या. मी अक्षरश: या दर्शनामुळं स्तिमित झालो. जवळपास डेथबेडवर या बाईला एवढा उत्साह आहे, तर आपण एवढ्या धड शरीराचे असून मागं का राहतो? त्या दिवसापासून मी या कामात पुरता ओढला गेलो.''

मीही त्यांची व्हीलचेअर ढकलली. मी ती ढकललेली पहिलीच व्हीलचेअर. त्यांच्या संस्थेत पॅसेजमध्ये एका बाजूला उतार आहे. विरुध्द बाजूनं आम्ही यायचो तेव्हा मी ढकलू लागायचो. पण त्या वेळी त्याही आपल्या हातांनी बाजूची चाकं जोरजोरात फिरवून मला मदत करायच्याच. त्यांची व्हीलचेअर हलकी आहे. ती इंपोर्टेड आहे. तिचा इतिहासही एकदा त्यांनी मला सांगितला.

नसीमा दीदींनी मुंबईला झालेल्या अपंगांच्या क्रीडा स्पर्धेत भाग घेतला. त्या टेबलटेनिस, भालाफेक, गोळाफेक, व्हीलचेअर रेस इत्यादी खेळांत चँपियन आहेत. ७३ सालातल्या 'इव्हिनिंग न्यूज' या मुंबईच्या पेपरमध्ये त्यांचा व्हीलचेअरवर बसून भालाफेक करताना फोटो आला होता. त्याखाली तपशील होता : 'कोल्हापूरच्या नसीमा हुरजूक यांनी स्त्रियांच्या सर्व खेळांवर प्रभाव पाडला व त्यांना वैयक्तिक चँपियनशिपही मिळाली.' या यशामुळे त्यांना इंग्लंडच्या स्पर्धेसाठीही पाठवायचं ठरलं. मुंबईच्या एक संस्थेने त्यांच्याबरोबर अटेंडण्ट म्हणून मुंबईची एक फिजिओथेरपिस्ट दिली होती. खरं तर यांना सहायक म्हणून, यांचं सर्व करू शकणारी एक तर घरातली किंवा सहकारी व्यक्ती पाठवायला हवी होती. ती मुंबईची मुलगी त्यांना एअरपोर्टवरच भेटली. नसीमादीदी पॅराप्लेजिक

असल्यानं त्यांना लघवी-संडासचं सेन्सेशनच नसतं.अशा कामांना मदत करायला तिनं नकार दिला. म्हणाली, ''इट्स नॉट माय वर्क.'' ते इंग्लंडला पोचल्यावर ती तिथं कुठंतरी गायबच झाली. तिथल्या कॉट उंच. त्यामुळं त्यांना स्वत: होऊन त्यावर चढता येईना. मदतनीस नसल्यानं आठ दिवस त्यांनी प्रातर्विधीशिवाय काढले. ती मुलगी वेळेवर न आल्यानं स्पोर्टमधल्या त्यांच्या इव्हेंटच्या वेळी या पोचूच शकल्या नाहीत. ती उगवल्यावर त्या तिथं पोचल्या. मग त्यांना जो असेल त्या इव्हेंटमध्ये भाग घ्यायला सांगण्यात आलं. पण तिथं त्यांची भारतातून नेलेली व्हीलचेअर मोडली. तिथल्या लोकांनी त्यांना तिथली नवीन व्हीलचेअर दिली, तेव्हा त्या थोडाफार भाग घेऊ शकल्या.'

नंतर ती मुलगी म्हणाली, ''तुम्ही आता एकट्या परत जा. मी इथंच राहणार आहे.'' नसीमा दीदींना धक्काच बसला; पण त्यांनी 'निदान तिनं यांना एअरपोर्टपर्यंत तरी पोचवलंच पाहिजे' असं बजावलं. ती मुलगी म्हणाली, ''पण ही तुम्हांला मिळालेली व्हीलचेअर आम्हांला तिकडे परत केली पाहिजे.'' तीन महिन्यांचा कोर्स करून ती मुलगी परत आल्यावर तिची पत्रं यायची : 'आमची व्हीलचेअर द्या.' नसीमा दीदींनी तिला कळवलं : 'ती मला दिलेली आहे. तुझी असेल तर पावती प्रोड्युस कर.' मग तिनं नाद सोडला. नंतर नसीमा दीदींना कळलं, की हा या संस्थेचा धंदाच आहे. अपंगाच्या नावानं कुणालातरी फॉरेनचा चान्स द्यायचा. येताना ड्युटी फ्री व्हीलचेअर आणायला सांगायची आणि इथं भरपूर किमतीला श्रीमंत अपंगांना विकायची. या प्रकारावर नसीमा दीदींनी 'भाग्यातले दुर्भाग्य' असा लेख लिहिला. अनेक जण त्यावर म्हणाले, ''हा प्रकार दर वर्षीच घडतो; पण आवाज उठवणारी तू पहिलीच.''

व्हीलचेअर म्हणजे त्यांचा प्राणच. एकदा त्यांच्या संस्थेच्या रिक्षातून जाताना वर बांधलेल्या व्हीलचेअरचा स्क्रू पडल्याचा आवाज झाला. त्यांनी ड्रायव्हरला तो शोधायला पाठवलं. तो शोधायला गेला असता म्हणाल्या, ''व्हीलचेअर म्हणजे शरीराचा भाग झालाय. अंगाला लागलं तरी चालतं, ते बरं होऊ शकतं; पण व्हीलचेअरचा एखादा पार्ट गेला, मोडला, तर तो सहजासहजी कुठून मिळणार? हालचालच बंद होते अगदी.''

तेवढ्यात तो ड्रायव्हर आला. त्यानं तो स्क्रू शोधला होता. आणखी काही पडायला नको म्हणून त्यांनी त्याला पुढचं छोटं चाकच काढायला लावून तिला खाली रिक्षात आणायला लावलं. रिक्षा चालू झाल्यावर म्हणाल्या, ''ही व्हीलचेअर अगदी लाईट आहे. तरी मला ती ढकलायला अलीकडं त्रास होतो. हातात पहिल्यासारखी ताकद राहिली नाही. तर इतर अपंगांना तर किती त्रास पडत असेल? शासनातर्फे किंवा दिखाऊ संस्थांतर्फे स्वस्त व्हीलचेअर समारंभात